# प्रकरण ५ वे

# समारोप

# समारोप

इंग्रज सरकार दिडशे वर्षे भारतावर राज्य करुन त्यानंतर हा देश सोडून गेले. परंतु त्या मिळालेल्या स्वातंत्र्याने दलितांच्या स्वातंत्र्यावर कांहीही फरक पडला नाही. स्वतंत्र भारताने निर्माण केलेल्या लोकशाही प्रधान राज्य घटनेने भारतीय समाजातील सर्वच स्तरांतील माणसांना तत्वत: सर्व प्रकारचे हक्क समाज भूमिकेवरुन प्रदान केले. शतकानुशतके अस्पृश्य म्हणून जीवन जगणाऱ्या दलित समाजाच्या दृष्टीने तर या घटनेला विशेषच महत्व आहे. जे पिळलेले गेले आहेत. वर्षानुवर्षे ज्यांच्यावर अन्याय अत्याचार होत आहेत ते दलित होत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच अर्थाने दलित हा शब्द वापरलेला आहे. तसेच पारंपरिक विचारधारा आणि मानवी मूल्यधिष्ठित विचार - धारा यांच्या संघर्षातुन दलित समाजात 'विद्रोही जाणीव' प्रज्वलित झाली होती. या विद्रोही जाणिवेलाच दलित जाणीव म्हणूनही संबोधले जाते. हे डॉ. किरवले यांचे मत यथायोग्य वाटते. त्यानंतर दलित साहित्य म्हणजे काय हे सांगत असताना दिशान दिशांतर या पुस्तकातील प्रा. दत्ता भगत यांचे विचार महत्त्वाचे वाटतात ते म्हणतात, 'आंबेडकरी विचार आत्मसात केल्यामुळे प्राप्त होणाऱ्या जीवन विषयक दृष्टीकोनाधारे स्वत:ला व स्वत: भोवतीच्या वास्तवाला जाणून घेण्याच्या उत्कट इच्छाशक्तीचा शब्दरुप आविष्कार म्हणजे दलित साहित्य होय.'

दलित साहित्याचे स्वरुप पाहत असताना सुरवातीला दलित साहित्यात कविता निर्माण झाली. चोखामेळा, कर्ममेळा यांच्या कुटुंबापासून कवितेच्या रुपाने दलित वेदना साहित्यात आणली. त्यानंतर स्वातंत्र्यानंतरची विद्रोही कविता डॉ. आंबेडकरांच्या विचाराने प्रेरीत होऊन आली. नामदेव ढसाळ, दया पवार, प्रा. केशव

मेश्राम, वामन निंबाळकर, वामन कर्डक तसेच अरुण काळे, प्रज्ञा लोखंडे, संध्या रंगारी इत्यादी कवी व कवयित्रींनी आपल्या दलितपणाच्या वेदना विद्रोही स्वरुपात साहित्यात मांडल्या आहेत.

कवितेबरोबर दलित कथाही लिहिली गेली. अण्णाभाऊ साठे सारख्या प्रतिभावंताने सुरवातीला सर्वसामान्य माणसाला कथेच्या रुपात साहित्यात मांडले. त्यानंतर शंकरराव खरात, बाबुराव बागूल, प्रा. केशव मेश्राम, वामन होवाळ, योगिराज वाघमारे, अमिताभ, गौतमीपुत्र कांबळे इत्यादी लेखकांनी कथेच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

कथा आणि कवितेच्या तुलनेत दलित साहित्यात कादंबरी लेखनाचे प्रमाण थोडे कमी आहे. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, प्रा. केशत मेश्राम, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, नामदेव व्हटकर इत्यादी लेखकांनी दलित कादंबरी चांगल्या पद्धतीने लिहिली आहे.

दलित स्तरातील लेखकाचा विद्रोह,त्याच्या वेदना त्याचा नकार प्रभावीरितीने व्यक्त झाला तो रंगभूमीच्या माध्यमातून सुरवातीला आंबेडकरी, जलशाच्या माध्यमातून असा प्रयत्न झाला. त्यानंतर किसन फागु बनसोडे, म.भि. चिटर्णीस, प्रभाकर गणवीर, गंगाधर पानतावणे, सुरेश वंजारी, दत्ता भगत इत्यादी लेखकांनी उल्लेखनीय नाटके लिहून दलित साहित्यात मोलाची भर टाकली आहे.

दलित साहित्याचे स्वरुप पारंपरिक साहित्यापेक्षा वेगळे असल्याने त्यासाठी वेगळी समीक्षा लिहिली गेली. त्यात डॉ. म. ना. वानखडे, म.भि. चिटणीस, प्रा.रा.ग. जाधव, डॉ. भालचंद्र फडके, डॉ. गंगाधर पानतावणे इत्यादी समीक्षकांनी मौलिक काम केले आहे.

वर्षानुवर्षे झेलत असलेल्या दु:खाचे वास्तव चित्रण दलित आत्मकथनांच्या मधून घडविण्याचे काम आत्मकथनकारांनी केले आहे. यात दया पवार, प्र .ई. सोनकांबळे, शरणकुमार लिंबाळे,माधव कोंडविलकर,शांताबाई कांबळे, बेबी कांबळे, विमल मोरे, उर्मिला पवार इ. साहित्यिकांनी मोलाचे योगदान दिले आहे. दलितांच्या जीवनाचे शोषण, दैन्य, अन्याय, अत्याचारांचे चित्र यात आहे.

अनेक वर्षे गुलाम असणाऱ्या दलिताना डॉ. आंबेडकरांनी जीवनाचा नवा मार्ग दाखविला अन्याय, अत्याचार, गुलामगिरी विरुध्द आवाज उठविण्याचे बळ दिले. 'शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा.' या सारख्या मौलिक विचाराच्या प्रेरणेतून दलित तरुण शिकला अन्यायी प्रवृत्तीविरुध्द संघर्ष करु लागला. वर्षानुवर्षे आपण जे भोगले व आज ही जे भोगतो. तो ते आपल्या शब्दशक्तीच्या रुपाने साहित्यात उतरवू लागला. माणूस आत्मसन्मानाशिवाय जगू शकत नाही. याची जाणीव दलितांना झाली. व ते सर्व आत्मसन्मानासाठी झगडू लागले. त्या झगड्याचे वर्णन दलित साहित्यात चित्रित झालेले आपल्याला दिसून येते.

आत्मचरित्र हे आयुष्याच्या संध्याकाळचे शेवटच्या टप्प्यावरचे लेखन असते तसे दलित आत्मकथनाच्या बाबतीत घडत नाही. दलित आत्मकथने लेखकांनी/ लेखिकेंनी ऐन उमेदीच्या काळात लिहिली आहेत. त्यामुळे आत्मचरित्रामध्ये येणारा आयुष्याचा जीवनपट व्यापक असतो.आणि ऐन उमेदीच्या काळात दलित आत्मकथने येत असल्याने आयुष्याच्या मध्यावरच ही लिहिली जातात. दलित म्हणून सुरु केलेल्या आणि माणुसपणाच्या मुक्कामावर पोहोचलेल्या व्यक्तीचा आणि समाजाचा हा प्रवास असतो. दलित आत्मकथनाला आत्मकथन न म्हणता स्वकथन म्हणावे अशा पध्दतीचा विचार डॉ. यशवंत मनोहर यांनी मांडले आहेत. परंतु आत्मकथन

हीच संज्ञा योग्य असल्याचे मत अनेक समीक्षकांनी मांडली आहे.कारण आत्मकथन-कारत्या च्या आत्मकथनातून गतकाळातील आठवणी सांगत असतो. हा गतकाळ त्याच्या आयुष्याचा एक भाग असतो. तर ज्यांनी हे भोगले, ज्यांच्या वाट्याला हे दुःख आहे, ज्यांचे शोषण झाले होते, आहे, त्यांना जागृत करावयाचे असते. नव्या पिढीच्या जीवनात तरी ते घडू नये. म्हणून विद्रोहाची आग पेटवायची असते. त्याच बरोबर जे कुणी, ज्यांचा समाज,ज्यांचे पुर्वज दलितांच्या या दुःख भोगाला कारणीभुत ठरले असतील त्यांनी अंतर्मुख व्हावे असे या आत्मकथनांचा हेतु आहे.

दलितांना डॉ.आंबेडकरांनी आत्मभान दिले. तेव्हा त्यांना अस्पृश्यतेची जाणीव झाली. अस्पृश्यतेविषयीच्या आपल्या कडवट भावना, राग, संताप दलित लेखकांनी आपल्या आत्मकथनातून व्यक्त केला. अस्पृश्यतेमुळे भोगलेल्या दुःखाचे अनुभव त्यांच्या लेखनातून वेगवेगळ्या प्रसंगाच्या माध्यमातून चित्रित झालेले आहेत. दलित आत्मकथनामधून चित्रित झालेल्या व्यक्तीरेखा त्यांच्या वेगळ्या स्वभाव वैशिष्टयामुळे निश्चितच लक्षात राहतात.

दलित आत्मथनांच्यामधून चित्रीत झालेली स्त्री ही दलितांहून दलित आहे. ती सतत राबणारी, नवऱ्याच्या सुखात सुख माननारी, आहोरात्र त्याची सावलीसारखी सोबत करणारी आहे. त्याची त्याच्या मुलाबाळांची, फुटक्या-तुटक्या संसाराची काळजी करणारी त्याला जपणारी शोषिक मनाची ती स्त्री आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या अगोदर स्त्रीयांना एक भोग वस्तु या पलिकडे महत्व नव्हते. ब्राम्हणी उच्च वर्णीयांचा प्रभाव समाज मनावर होता. त्यामुळे समाजात स्त्रीला दुय्यम स्थान होते. एकोणिसाव्या शतकातच स्त्री शिक्षणाचा तिच्या प्रतिष्ठेचा आणि तिच्या अस्तित्वाचा विचार प्रभावीपणे मांडला आहे.हिंदु समाजाने धर्मग्रंथाचा आश्रय

घेऊन स्त्रीची जी अवहेलना चालविली होती त्यावर म.फुले, डॉ. आंबेडकर यांनी आघात केले. स्त्रीला विचार प्रवृत्त करायचे असेल तर 'विद्याप्रवृत्त' केले पाहिजे हा विचार त्यांनी मांडला.

समाज कोणाताही असो, सर्वाधिक शोषण त्या त्या समाजासह सर्वांनीच स्त्रीयांचे केलेले आहे. प्रस्थापित समाजव्यवस्थेने स्त्रीयांवरील अन्याय-अत्याचाराच्या बाबतीत कोणतीही सीमा बाळगली नाही. या सगळ्यांचा अतिरेक झाला. दलितांवर शुद्र म्हणून जसे अन्याय केले. याच पध्दतीने दलित स्त्रियांवरही अन्याय केले. याचे चित्रण दलित आत्मकथनामधून आले आहे.

दलित वर्गातील स्त्रीचे दुहेरी शोषण होत त्यांच्या अशिक्षितपणामुळे त्यांच्यात असणाऱ्या अंधश्रध्दा, भोळ्या समजुती त्यामुळे त्यांच होणार शोषण याच चित्रण दलित स्त्रियांच्या आत्मकथनातून प्रामुख्याने झाल्याचे आपल्याला दिसून येते.

दलित अनुभव सुरवातीला कवितेच्या स्वरुपात चोखामेळा यांनी मांडले आहेत. त्यानंतर पी. विठ्ठल यांचे 'क्रिडा जीवन' हे आत्मचरित्र प्रसिध्द झाले. त्यानंतर स. ना. सुर्यवंशी यांचे 'आगा जे कल्पिले नाही' नावाचे आत्मचरित्र प्रसिध्द झाले परंतु या सर्वातून दलित जीवनानुभवापेक्षा मी माझ्या आयुष्यात कसा यशस्वी झालो. याचेच चित्रण करण्यावर भर दिला आहे. मात्र दया पवार यांचे 'बलुत' (१९७८), व प्र. ई. सोनकांबळे यांचे 'आठवणीचे पक्षी' या दोन आत्मकथनांनी मराठी साहित्यात दलित अनुभवाची वाट मोकळी केली. त्यानंतर अनेक आत्मकथने लिहिली गेली. पुरुषांबरोबर स्त्रीयांनी ही अशा पध्दतीची आत्मकथने लिहिली. व आपले दलितापणाचे व स्त्रीपणाचे अनुभव अतिशय समर्थपणे मांडले.

दलित स्त्री आत्मकथनांच्या लेखिकांनी त्यांच्या जाती समूहातील समग्र स्त्रीयांच्या वाट्याला येणारे कनिष्ठत्व, अधिकच तळमळीने प्रकट केले आहे. विशेषत्वाने बेबीताई कांबळे (जिणं आमुचं), मुक्ता सर्वगोड (मिटलेली कवाडे) नजुबाई गावित (आदोर), कुमुद पावडे ( अंत:स्फोट), उर्मिला पवार (आयदान), यांनी आपल्याभोवती दिसणाऱ्या आपल्या समूहातील स्त्रियांच्या कष्टाचे - सोसण्याचे चित्र उभे केलेले दिसते.

एकूणच, स्त्रीयांच्या आत्मकथनातून त्यांची 'मुलगी' म्हणून केली जाणारी घडण स्त्रीच्या वाट्याला आलेली दिसते. या समग्र स्त्री जातीच्या वाटयाला येणारी दुटप्पी वागणुक, स्त्रीचे पुरुष सापेक्ष स्थान, पती-पत्नी संबंधातील स्त्रीची दुय्यमता अशा सर्व गोष्टींचा साक्षेपांन विचार केलेला आपणास आढळून येतो.

गरिबी-अज्ञान-यामुळे अंधश्रध्दा रुढी-परंपरेच्या मंत्र-तंत्र-गंडे-दोरे-उतारे-देव-धर्म यांच्या चक्रात भडकलेली ही दलित जमात, अंधार यात्रेत असल्या सारखी या सगळ्या लेखिकांना वाटते. या स्वत:च्या समाजाची दारिद्रय-अज्ञान-अंध:श्रध्दा यातून सुटका झाली, तर इतर समाजाकडून होणाऱ्या उपेक्षेविरोधी या माणसांना मानवर करता येईल. ही भावना ह्या सगळ्या लेखिकांमध्ये दिसते. म्हणून पोट-तिडकिने स्वत:ला ज्या क्षेत्रात, ज्याप्रकारे जमेल तसा वाटा उचलण्याची दृष्टी धडपडही या लेखिकांची दिसून येते.

कुमुद पावडे, मुक्ता सर्वगोड, व उर्मिला पवार या समाजातील सुशिक्षित स्त्रीया दलित स्त्रीच्या दुय्यमतेचा मूलगामी विचार करतात. स्वत: पारंपरिक पुरुषसापेक्ष मूल्यातून बाजुला होताना दिसतात. समाजकार्य करतांना राजकीय व्यक्तींचा उच्च

जातीच्या लोकांचा दृष्टिकोन कसा उपेक्षेचाच व निष्क्रियतेचा आहे.हे त्यांच्या लक्षात येते. त्या स्वतः सामोरं येणाऱ्या प्रश्नांना, व्यावहारिक उपाय योजून दलितांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांच्यासमोर केवळ दलित स्त्रीचाच विचार नाही. तर सगळ्याच दलित समाजाच्या उपेक्षेचा विचार आहे.

दलित समाजातील सगळ्याच स्त्रियांच्या आत्मकथनाला दोन परिमाणे दिसतात. दलित समाजाचे जीवन आणि स्त्री म्हणून दुय्यमत्वाचे जीवन, स्त्री म्हणून या सगळ्याच स्त्रीयांना दुय्यमत्व मिळालेले असले तरी आपल्या समग्र जात बांधवाच्या कनिष्ठतेचे व त्यांना मिळणाऱ्या 'अमानवी'वागणुकीचे दु:ख आणि टोचणी या स्त्रीयांच्या मनाला अधिकच आहे. हे निश्चितच म्हणूनच केवळ स्त्री जीवन दर्शन त्या घडवित नाहीत. त्यापेक्षा आपल्या समाजाचे, जातीचे, जीवन त्यातील जीवन पध्दती, दारिद्रय रुढी-परंपरा अंधश्रध्दा अज्ञान यांचे समग्र दर्शनच त्या घडवितात. सामाजिक मान आलेला स्त्रीयांनाही पत्नी म्हणुन मिळणाऱ्या वागणुकीचे चित्र पहायला मिळते.

'आयदान' या आत्मकथनातून उर्मिला पवार यांनी आपल्या जाती समूहाच्या जीवनातील अन्याय, उपेक्षा, दैन्य अज्ञान यांचे दर्शन इतर दलित स्त्रियांच्या आत्म-कथनाप्रमाणे स्वतंत्र वेगळे न दाखविता स्वत:च्या जीवनाच्या अनुषंगानेच त्यांची मांडणी केली आहे. 'दलित' म्हणून आणि 'दलित स्त्री' म्हणून वाट्याला आलेल्या दुय्यमतेचे दु:ख त्या अतिशय साधेपणाने आक्रमक पवित्रा न घेताही भाष्य न करताही भेदकपणे मांडतात. शिक्षणामुळे स्वत:च्या व्यक्तिमत्वात झालेले परिवर्तन आपल्या दलित व्यक्तींची अज्ञान, अंधश्रध्दा यापासून सुटका करण्याची त्यांची तळमळ व शिक्षिका म्हणून उपलब्ध कार्यक्षेत्रात त्यांनी केलेले प्रयत्न या सगळ्यांचे जीवनाच्या

वाटचालीत दर्शन त्या घडवितात. अनुभवांचे सहज, प्रांजळ व प्रत्ययकारी दर्शन त्यांच्या आत्मकथनाला मिळते व वाङ्.मयीन पातळीवर जाते.

'आयदान' या आत्मकथनातून अधिक खुलेपणाने आत्मप्रकटीकरण करण्याची प्रवृत्ती निर्माण होताना दिसते. पारंपरिकतेच्या प्रभावाने ज्या अनुभवांचे आणि भावनांचे प्रकटीकरण करायला संकोच वाटायचा, त्यांचे प्रकटीकरण स्त्रीया करतात. तारूण्यात पुरुषांचे वाटलेले आकर्षण हाही अनुभव त्यातीलच आहे. या अनुभवाच वर्णनही उर्मिला पवार यांनी आयदानमधून केले आहेत.

'आयदान' या आत्मकथनातील अनुभव मूर्त करण्यासाठी कधी बोली भाषेतील नित्याची भाषा व शब्द उर्मिला पवार वापरतात. कधी रोजच्या जीवनातील उपमा, अलंकार, प्रतिमा याचा वापर केला आहे. व्यक्ती, प्रसंग किंवा दृश्य यांचे बारकाईने अवलोकन व त्यामुळे प्रस्फुरीत झालेल्या मनोभावना यांचे शब्दचित्र परिणामकारक ठरते. प्रसंगातील नाट्य, काव्या नेमकेपणाने हेरले आहे. म्हणी, वाक्प्रचारांचा बोलीभाषेतील शब्दकलांचा उपयोग साधलेला असतो.या सगळ्यांच्या सहयोजनेने घटना,प्रसंग, अनुभव जीवंत होणे शक्य होताना दिसते.

अनौपचारिक पध्दतीने ग्रामीण अशा स्त्रियांच्या भाषेत लिहिलेले हे पुस्तक काही प्रमाणात कोकणी बोलीचा अनुभव देते. पण येथे व्यक्तीचा विचार नाही. मोठ्या प्रमाणात समाज दर्शन घडवणारे वार्तापत्र आहे. येथे मोठ्या प्रमाणात प्रकट चिंतन आहे.पण त्यात भावनीक आवाहन करणारे वक्तृत्व असले तरीही स्वातंत्र विचार मंथन आहे. दलित स्त्रीच्या दृष्टीकोनातून केलेले हे दलित समाजाच्या अंतरंगाचे विशेषत: स्त्रिजीवनाचे स्पष्ट चित्र मांडलेले आहे.

आंबेडकरांचा विचार जागोजागी उघडपणे पुरस्कृत करणारे हे आत्मकथन जातिव्यवस्थेत भरडून निघणाऱ्या दलित समाजाचे पवार यांनी केलेले वर्णन आंबेडकरांनी केलेल्या समाज चिकित्सेला मिळते जुळते आहे. दलितांची उपासमार गुलामगिरीची त्यांना झालेली सवय, ज्या हिंदू समाजाने त्यांना नागवले त्या हिंदु समाजाशी इमानदार राहण्याची त्यांची लाचार धडपड, हिंदु देवदेवतांवरचा त्यांचा विश्वास आणि त्यांच्या अंधश्रध्दा या सर्वांचे फार चांगले दर्शन उर्मिला पवार घडवतात. आंबेडकर प्रणित समाजाचे स्वरुप पवार गृहीत धरतात. दलितांच्या अंधश्रध्दाना हिंदु धर्म जबाबदार आहे. दलित स्त्रियांच्या पशुवत जीवनाला या समाजाचे कायदेकानुन रीतिरिवाज जबाबदार आहेत. दलितांच्या दयनीय ऐहिक अवस्थेला चार्तुवर्ण्य पध्दती जबाबदार आहे. त्या पुन्हा पुन्हा आवर्जुन सांगतात.

'आयदान' मध्ये आंबेडकरी विचाराचे विविध पदर स्वत:च्या कहाणीतून किंवा भोवतालच्या माणसांच्या चित्रणातून दाखवले जातात. आंबेडकरी विचारांच्या संदर्भात दलित समाजाचे विचारांना चालना देणारे चित्र उभे करण्याची क्षमता उर्मिला पवार यांच्या लेखनात नक्कीच आहे.

दलित समाजातील अंधश्रध्देचे अज्ञानापोटी येणाऱ्या देवभोळेपणाचे फार चांगले दर्शन या आत्मकथनात येते. या आत्मकथनात जातीयवादी परिस्थिती विरुध्द आक्रस्ताळेपणाने कोठेही तक्रार केलेली नाही. महारांच्या सामुहिक जीवनातील त्रुटी लेखिकेला जाणवत असाव्यात असे वाटते. परंतु त्याचा उघड उल्लेख त्यांनी कोठेही केलेला नाही. आयुष्यात आपण केलेल्या प्रमादांची निवेदिकेने प्रांजळ कबुली दिली आहे. प्रस्थापित व्यवस्थे विषयीचा राग, पितृसत्ताक कुटुंब पध्दतीने केलेला अन्याय लेखिकेने अनेक ठिकाणी व्यक्त केला आहे. या आत्मकथनात लेखिकेने वास्तवाचे

अत्यंत प्रत्ययकारी चित्र रेखाटले आहे. हे वास्तव इतके विदारक आहे की, लेखिकेने संयमाने रेखाटलेले सत्यपूर्ण चित्र वाचकाला अस्वस्थ करते. सुन्न करते व अखेरीस अंतर्मुख करुन विचार प्रवण बनवते. असे चित्र रेखाटण्यात लेखिकाचा जीवनविषयक संमजस दृष्टिकोन वृत्तीचा व्यापकपणा व मनाची प्रगल्भता प्रकट होते. या गुण वैशिष्ट्यांमुळेच वाचकांच्या मनावर विलक्षण प्रभाव पाडण्याचे सामर्थ्य पवार यांच्या लेखनात निर्माण झाल्याचे दिसते.

आपल्या इथल्या समाज व्यवस्थेने, संस्कृतीने समाजाच्या एका संपूर्ण अंगाला 'दलित' दर्जा दिलेला आहे. कायमचे हीन करुन ठेवलेले आहे. ज्याला तो दर्जा मिळाला तो समाज जवळजवळ एकसारख्या सामाजिक - आर्थिक विषमता धिष्टित समान पिरिस्थिती व समान जीवन मूल्ये जगतो आहे. व्यक्तीही आपल्या समाजाची एक घटक असते. दलित व्यक्ती या टाकलेल्या उपेक्षित अशा 'दलित' समाजाची घटक असल्याने तिच्या व्यक्ति-जीवनाचा आविष्कार हा एक सामाजिक आविष्कार असतो. म्हणून व्यक्ती विशिष्ट जीवनसुध्दा समाज विशिष्ट पातळीवर सामाजिक मूल्य जाणीवा व दृष्टी घेऊनच अवतरते. त्यामुळे इथे व्यक्तिविशिष्टता घेऊन येणारी दलित आत्मकथा एकाचवेळी त्या समाजाची प्रातिनिधिक कथा बनते. म्हणून तिला अपूर्वता ही प्राप्त होते. समाज व्यवस्थेने दिलेले एकाच प्रकारचे दैन्य, दु:ख हा दलित जीवनाचा स्थायीभाव झालेला आहे. याचे चित्रण उर्मिला पवार यांनी आयदान मध्ये केलेले दिसून येते.

अज्ञान,अंधश्रध्दा,दारिद्रय,अस्पृश्यता इत्यादी राक्षसाच्या पंजात सापडलेला आणि शतकानुशतके पायदळी तुडवला गेलेला एक विशिष्ट समाज या आत्म-कथनांमधून साकार होतो. हे 'आयदान' चे लक्षणीय यश मानावे लागते. पुर्वा

निश्चितभुमिकेशी बांधिल न राहता सरळ जीवनाकडे जाण्याचे व कुठल्याही भूमिकेचे दडपण येऊ न देता जीवनानुभवाकडे पाहण्याचे स्वातंत्र्य अबाधित ठेवणे हे 'आयदान' चे गुणअवश्य नोंदविले पाहिजे.हे आत्मकथन म्हणजे वेदना पचवून प्रगल्भ झालेल्या व्यक्तीजीवनाचा आलेखच आहे. आघातांनी शहाण्या झालेल्या निरंतर राहणाऱ्या प्रश्नांनी प्रगल्भ केलेल्या असंस्कृतपणाचा पदोपदी अनुभव घेत सुसंस्कृत झालेल्या संवेदनशील मनाची अथपासून इथपर्यंतची कुचंबणा म्हणजे ही आत्मकथा होय. अशा सर्वग्राही दुःखाचे चित्रण मराठी साहित्यात खरोखरच अपुर्व होय. 'आयदान' मध्ये प्रामुख्याने दुःखदर्शन, जीवनोत्मुखता व सामाजिक वास्तव दर्शन भूमिका विरहीत वा बंधमुक्त सामाजिकता, सामाजिक प्रतिनिधिक आविष्कार संवेदनशिल मनाचो वेदनानुभूतीमय प्रगल्भता आणि अपुर्वता यातून ठळकपणे दिसते.'आत्मभान' या नावाने लिहिलेल्या प्रस्तावनेत उर्मिला पवार यांनी 'आयदान' चा खुलासा केला आहे. ''प्लॅस्टिकच' युग येण्यापुर्वी आपल्या संसारात बांबुपासून तयार केलेली सुपं, रोवळ्या, परड्या, दारे, करंडे इत्यादी वस्तुंना महत्व होते. या वस्तुच सामान्यरुप म्हणजे 'आयदान' यांना दुसरा शब्द 'आवतं' असाही आहे. कोकणाबाहेर बुरुड नावाच्या भटक्या विमुक्त जातीचा पोट भरण्याचा हा व्यवसाय आहे. कोकणात हा व्यवसाय अनुसुचित जातींच्या यादीत असलेल्या 'महार' या जातीकडे होता. तो का हे माहित नाही. आजही तो क्षीण झाला असला तरी टिकुन आहे. माझी आई आयदान करायची आईच्या हातात अखंड फिरणार आयदान आणि मी करत असलेलं लेखन यांची वीण, एका अर्थाने मला सारखी दिसते. आणि आमच्या मधला वेदनेचा धागा एक आहे हे ही जाणवत.''

'आयदान' हा शब्द प्रतीकात्मक आत्मकथनांचा आशय मुखर करत स्त्रीच्या

विचारांना, कल्पनांना, महत्वकांक्षांना पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत कडेकोट कुंपण घालण्याचा सर्वतोपरी प्रयत्न केल्यावर ही,ती बुजगावणं होणं नाकारत आहे. तिच्या-पाशी अवघ्या आयुष्याकडे बघण्याची स्वत:ची दृष्टी नाही. ही दृष्टी सामाजिक, सांस्कृतिक घडामोडींचा वेध घेणारी आहे. हिंमतीन 'स्व' चा शोध घेणारी आहे. रात्रं-दिवस आयदान विणुन आईन स्वत:च्या व्यथांवर आपणच उपचार केला होता. स्वत: वर उपचार करावा म्हणुन लेखिकेने हे 'आयदान' विणलं आहे. स्त्री जेव्हा लिहिती होते. तेव्हा विलक्षण संवेदनशीलतेने ती मानवी दु:खावर उपचार करत असते. त्यामुळे 'आयदान' ही उर्मिला पवार यांची आत्मकथा प्रवाही हलवून सोडणारी समाज आणि संस्कृतीचा दस्ताऐवज आहे. विमलच्या जीवनाचा पुर्वार्ध आणि उर्मिला च्या जीवनाचा उत्तरार्ध असा एक अभिन्न प्रवास यात कुठेही सांकेतीकता नाही. त्यामुळे कृतकता नाही. वास्तवाचा आणि जीवन सत्याचा निर्लेप शोध इथे जाणवतो लेखिकेच्या जीवनाचा उत्तरार्ध अधिक अंतर्मुख आणि अधिक आत्म-विश्लेषी आहे' हे डॉ. गंगाधर पानतावणे यांनी 'आयदान' विषयी 'ललित' मध्ये मांडलेले मत रास्तच आहे.

आजचा बुध्दीमान दलित समाज आंबेडकरांना विसरत चालला आहे. याची खंत उर्मिला पवारांच्या लेखनात तिव्रतेनं जाणवते. संकष्टी, चतुर्थी, गुरुवार, शनिवार सारखे वारांचे उपवास हा समाज आज करतो. आंबेडकरांनी हिंदुच्या देव-देवतांना नाकारले होते. आजचा सुशिक्षित दलित घरी देवदेवतांची पुजा करतो. पुर्वीच्या काळी आपल्या गुलामगिरीतुन दलित उच्चवर्णियांची प्रतिष्ठा सांभाळीत होता. आजही तो तेच करतोय यावर परखड टिका उर्मिला पवार करताना दिसतात.

'आयदान' या आत्मकथनाला प्रस्तुतीकरणाचा खास थाट आहे. मैत्रीणींच्या

घोळक्यात गप्पा माराव्यात असं निवेदन यात येतं. ग्रामीण जीवनातील खास शब्दांचा वापर करुनही बाकीचे भाषेचे रुप प्रमाण मराठीचे आहे. दलितांच्या जीवनातील खास शब्दांचा वापरही यात केलेला आढळतो. निवेदनातुन भाष्यात शिरताना ग्रामीण बोली शिष्ट बोलीत सफाईनं बदलते. व्यक्तीनिरपेक्ष संवाद, व्यक्ती निर्देशाविना व्यक्तीनामांचा वापर विशिष्ट नाम निर्देशाविना सर्वनामांचा वापर भुत-कालीन नित्य घटनांचा वापर भुतकालीन नित्य घटनांचा उल्लेख या विविध भाषिक क्लुपत्यांनी आत्मकथनाचे प्रस्तुतीकरण अनौपचारीक पण स्थलकालाने अबध्द, वर्णनात्मक पण प्रवाही बनते.

दलित म्हणून स्वत:ला वैयक्तिकरित्या आणि जाती समुहाच्या वाट्याला येणारी कनिष्ठता, उपेक्षा, अन्याय, अवमान, दारिद्रय यांचे घाव या आत्मकथनाच्या लेखिकेला अधिक तीव्रपणे घायाळ करताना दिसतात. आपल्या भोवतालच्या दलित व्यक्तींचे अज्ञान, अंध:श्रध्दा यापासुन सुटका करण्याची लेखिकेची तळमळ व एक कार्यकर्ती म्हणुन उपलब्ध कार्यक्षेत्रात त्यांनी केलेले प्रयत्न, या सगळ्यांचे जीवनाच्या वाटचालीत दर्शन उर्मिला पवार घडवितात. अनुभवांचे सहज, प्रांजळ व प्रत्ययकारी दर्शन असे रुप 'आयदान' ला मिळते, व ते वाड्.मयीन पातळीवर जाते. लेखिका आपल्या शिक्षणाचा, जाणिव जागृतीचा उपयोग आपल्या जातबांधवाना सुधारण्या-साठी करताना दिसते.